श्री राम चंद्र मिशन®
केवळ खाजगी वितरणाकरिता
ECHOES INDIA
मे २०१३ खंड ६ अंक ३

# पू. बाबूजी महाराजांचा ११४ वा जन्मदिवस महोत्सव





डायमंड जुबिली पार्क, तिरुप्पूर येथे नुकत्याच साजऱ्या झालेल्या पूज्य बाबूजी महाराज यांच्या ११४ व्या जन्मदिवस समारंभामध्ये आपल्या प्रिय गुरुदेवांनी आपल्या सर्वांवर पुनश्च त्यांच्या चिरंतन प्रेमाचा वर्षाव केला आणि मिशनने आपल्या वाटचालीतील एक मैलाचा दगड पार केला.

दि. २६ रोजी बंधू कमलेश यांचे तिरुप्पूर येथे आगमन झाले. त्यांनी काही तयार झालेल्या सुविधांचे उद्घाटन केले.



दि. २९ पर्यंत दररोज सकाळी ६.३०, ११, आणि सायंकाळी ५ वाजता सत्संग संचालित करण्यात आले. दि. २८ आणि २९ रोजी रात्री ९ वा. स्वयंसेवकांसाठी खास सत्संग झाले. रविवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळच्या सत्संगानंतर बंधू कमलेश यांनी पाच विवाह संपन्न केले.

दि. २६ पासूनच तिरुप्पूर येथे अभ्यासींचा ओघ सुरु झाला आणि ते, प्रत्यक्ष उत्सवादरम्यान लागणाऱ्या सर्व सोयी–सुविधा उपलब्ध असल्याची खातरजमा करणाऱ्या स्वयंसेवकांच्या कामामध्ये सहभागी झाले. निवास–तंबू, जेवण व्यवस्था, स्वयंपाकगृह, सुरक्षा, पाणीपुरवठा, आरोग्यविषयक यंत्रणा, उपहारगृह, मुलांचे केंद्र, प्रकाशन कक्ष इत्यादी तयार होते आणि अभ्यासींच्या अनेकविध गरजा भागवत होते. जेथे आवश्यकता असेल तेथे अभ्यासी सेवेत सहभागी होताना दिसत होते. हे सर्व पाहून एक लहान मूल म्हणाले "मला स्वयंसेवक हृदयापासून काम करताना दिसले."

आपले भंडारे हे जणू आध्यात्मिक सौंदर्याचा आविष्कार असतात. यामधून आपल्याला आध्यात्मिक जीवन भव्यतेने आणि भौतिक जीवन साधेपणाने जगण्याची शिकवण मिळते. दि. २९ रोजी भंडाऱ्याच्या पहिल्या दिवशी बंधू कमलेश यांनी त्यांच्या भाषणामध्ये वरील विषयावर भर दि–ला. त्यांनी बाबूजींचे 'व्हिस्पर्स'मधील दोन संदेश



वाचून दाखविले आणि मानवजातीच्या पुर्नजननाच्या महान योजनेमधील अभ्यासींची भूमिका स्पष्ट केली.

दि.२९ रोजी पूज्य गुरुदेवांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या भेटीची उद्घोषणा होताच अभ्यासींच्या आनंदास पारावार उरला नाही. त्यानंतर ध्यानगृहातील अतिभव्य अशा पडद्यांवर गुरुदेवांचे दर्शन होण्याचा क्षण हळूहळू जवळ येत गेला. अखेर त्यांनी बाबूजी मेमोरियल आश्रमाच्या ध्यानकक्षात प्रवेश करताच अभ्यासींची हृदये प्रेमाने भरुन आली आणि डोळे पाणावले. प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करणारा असा हा क्षण होता. त्यानंतरचा सत्संग आणि बाबूजी महाराजांनी दिलेले विशेष संदेश यामुळे मिशन आणि अभ्यासींची घेतली जाणारी ईश्वरीय जपणूक सर्वांनाच जाणवत होती. बाबूजींनी संदेशात म्हटले आहे, **“कमी परिश्रमाची पण नियमित अशा साधनेची जोड असलेली हृदयाची समग्र वचनबद्धताच फक्त अध्यात्मिक हृदयाला त्याच्या उच्चतम गंतव्यापर्यंत घेऊन जाते.”**

बंधू कमलेश यांनी २८ तारखेप्रमाणेच २९ तारखेस चार, ३० तारखेस तीन तर १ तारखेस चार असे विवाह संपन्न केले. सहजमार्गपद्धतीतिल हे विवाहसमारंभ साधेपणाचे प्रतिक असून भाषा आणि संस्कृतीच्या सीमा पार करुन कुटुंबांना एकमेकांशी एकरूप करतात.


अभ्यासी आणि मुले मिळून एकूण ३३००० व्यक्ती या उत्सवात सहभागी झाल्या होत्या. एवढे मोठे कुटुंब तीन दिवस आनंदाने एकत्र राहिले. निष्ठेने कामाला वाहून घेतलेल्या समारंभाच्या स्वयंसेवकांच्या चमूचे खास यशासाठी धन्यवाद की, त्यांचे गुरुदेव शेकडो मैल दूर असतानादेखील केवळ गुरुदेवांच्या हृदयापासून त्यांच्या हृदयांना मिळणाऱ्या मार्गदर्शनाखाली ते काम करीत होते. याशिवाय २५००० लोकांचा तीन वेळेचा स्वयंपाक





काहीही वाया न घालवता करणे हे कसे शक्य आहे? याठिकाणी २३ सुरक्षा ठाणी होती. तेथे अभ्यासी बंधू आळीपाळीने तीन वेगवेगळ्या वेळांदरम्यान कार्यरत होते. निवास व्यवस्थेचे व्यवस्थापन करणाऱ्या बंधू–भगिनींनी सर्वात पहिल्यांदा दोन महिन्यापूर्वी आपले कार्य सुरू केले होते. त्यांनी मर्यादित अशा उपलब्ध साधनांचा उपयोग करुन आपल्या राहण्याची उत्तम सोय केली होती. समारंभाच्या ठिकाणी विशेषत: भोजनकक्षात आणि उपहारगृहात माशा नावालासुद्धा दिसत नव्हत्या. आरोग्यभवन, स्वच्छताकर्मी आणि व्यवस्थापक यांनी आपला निवास आरोग्यपूर्ण आणि सुखकारक व्हावा यासाठी एकत्रितपणे पुरेपूर प्रयत्न केले. आपल्या सुखसोयींकरता ते रात्र–रात्र झोपले नाहीत आणि त्यांच्या विश्रांतीच्या काळातदेखिल ते सेप्टीक टँक्समध्ये फवारण्याच्या मिश्रणाची पिंपे, साफ–सफाईची साधने आणि वेगवेगळा केलेला कचरा यांच्या गराड्यात होते. यामुळेच २०१२ च्या भंडाऱ्यादरम्यान २०२ गॅस्ट्रोच्या केसेसच्या तुलनेत २०१३ मध्ये फक्त १०२ केसेस – त्याही प्रवासामुळे होणाऱ्या अतिसाराच्या घटना आरोग्यकेंद्राच्या निदर्शनास आल्या. भंडाऱ्याच्या ठिकाणची एकही घटना इथे नव्हती.












ह्याचे मुख्य कारण आर ओ पद्धतीने शुद्ध केलेले पाणी. तिरुप्पूरच्या तीव्र उन्हाळ्यात त्या तीन दिवसात सहा लक्ष लिटर आर ओ पद्धतीने शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व चोविस लक्ष लिटर पाणी इतर कारणांकरीता वापरले गेले. अभ्यासींच्या प्रवासविषयक गरजांच्या पूर्ततेसाठी वाय–फाय च्या सहाय्याने काम करणारे, बारा काउंटर असणारे 'प्रवासी सेवा दालन' सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

या सोहोळ्यादरम्यान अनेक नविन पुस्तके प्रकशित करण्यात आली. काही विशेष पुस्तके व व्हिडियो यांच्या प्रकाशनासमवेत विविध भाषांमधील जुन्या पुस्तकांचे पुनर्मुद्रणही प्रकाशित केले गेले. निवड करण्यासाठी मिशनचे साहित्य मोथ्या प्रमाणावर उपलब्ध होते. छायाचित्रांचे दालन गुरुदेवांच्या नयनरम्य छायाचित्रांनी सजले होते.

मोठी माणसे सत्संग व इतर कार्यक्रमात गुंतलेली होती तेव्हा मुलांना त्यांच्या वयाप्रमाणे गट करुन अनेक खेळ व विविध उपक्रमांमध्ये व्यग्र ठेवण्यात आले होते. ह्या वर्षी प्रथमच बारा ते सतरा वर्षांच्या मुलांसाठीसुद्धा अनेक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. मुलांना भंडारा कसा साजरा केला जातो, त्याकरीता कशी पूर्वतयारी केली जाते व प्रत्येक विभागाचे कामकाज कसे चालते हे प्रत्येक विभागात नेऊन दाखविण्यात आले.


बंधू कमलेश यांनी विभाग प्रमुख व केंद्र प्रमुख यांच्या बैठकीला तसेच पुराभिलेख विभागाच्या (मिशनच्या इतिहासाला जतन करणार गट) बैठकीला संबोधित केले. इतर स्वयंसेवकांना आपापल्या गटांना भेटून पुढील कार्यक्रमांबद्दल चर्चा करण्याची उत्तम संधी प्राप्त झाली.

अनेक लोकांनी रात्रंदिवस काम करुन इतरांचे राहणे सुकर केले. ह्या भंडाऱ्यात जे जे काही घडले, ते केवळ शब्दांमध्ये मांडणे अवघड आहे. बंधू कमलेश यांनी भंडाऱ्याच्या समारोपाच्या भाषणात, लक्ष वेधून न घेता शांतपणे काम करणाऱ्या, ह्या सर्व इश्वरीय दूतांचे गुरुदेवांची इच्छा पूर्ण करण्यास मदत केल्याबदल आभार मानले. ह्या सर्वाचा कळसाध्याय म्हणजे शेवटच्या दिवशी गुरुदेवांचा वाढदिवस ह्या वर्षी तिरुप्पूरला साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. गुरुदेव आपली हृदये या प्रसंगी प्रेमाने भरतील, अशा या सोहळ्याची वाट आपण आत्तापासूनच पहात आहोत.













## फेब्रुवारी २०१३

गुरुदेव अत्यंत व्यस्त होते व याचाच परिणाम म्हणून दमले होते. ते रोज तीन नविन प्रशिक्षकांना सिटींग्स देत होते. बहुतेक दिवशी ते त्यांच्या आसपास असणाऱ्या अभ्यासींनाही सिटींग देत असत. याशिवाय फ्रान्स येथून आलेल्या बंधू पिअरी यांच्याकडून ते त्यांच्या अंगदुखीसाठी काही उपचार घेत होते, ज्यामुळे त्यांच्या शरीराला आराम मिळण्यास सहाय्य होत होते. काम आणि प्रकृतिचा ताण असूनही पन्नास ISTP अभ्यासींना गुरुदेवांनी 'गायत्री' या आपल्या निवासस्थानी वेळात वेळ काढून आमंत्रित केले होते.

लालाजी मेमोरियल शाळेच्या बारावीच्या विद्यार्थ्यांनाही गुरुदेवांनी आमंत्रित केले होते. पाठांतर न करता आत्मसात करणे कसे आवश्यक आहे या वस्तुस्थितीबद्दल ते बोलले. विद्यार्थ्यांनी मूल्यमापन करण्यासाठी हृदयाचा उपयोग करून जे अत्यावशक आहे ते आत्मसात करावे आणि जे अत्यावश्यक नाही त्याला नाकारावे व याकरीता शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे असे ते या प्रसंगी म्हणाले.

एका अभ्यासीने गुरुदेवांना सांगितले की सफाई करतांना त्याला संपूर्ण शरीराला विद्युतप्रवाहाचा धक्का बसल्याचा अनुभव आला व त्यामूळे तो खूप भयभीत झाला. यावर गुरुदेव उत्तरले, "भिती वाटण्याची अजिबात आवश्यकता नाही. हे पहा, प्रत्येकजण कधी ना कधीतरी मरणारच आहे, हे टाळता येण्याजोगे नाही. हे जर आपल्याला माहित आहे, तर कुठल्याही गोष्टीला घाबरण्याची गरजच काय?"

## मार्च २०१३

मार्चच्या सुरुवातीच्या काळात गुरुदेवांच्या कुटीराच्या नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यामध्ये असल्याने गुरुदेवांचे वास्तव्य 'गायत्री' या त्यांच्या निवासस्थानी होते. बंधू कृष्णा स्वतः जातीने हजर राहून कुटीराच्या कामावर देखरेख करीत होते. भोवतालच्या बगीच्यामधेही एक मोठा समूह कार्यरत होता.

बहुतेक दुपारी गुरुदेव 'उपनिषद गंगा' या टि.व्ही. मालिकेचे भाग पहात असत. त्यामध्ये ते पूर्णतः रंगून गेले होते. केवळ उत्तम आशयच नव्हे तर या मालिकेचे दिग्दर्शनही अत्युत्कृष्ट असल्याचे त्यांना जाणवले. गुरुवार, दि.१४ मार्च रोजी गुरुदेवांच्या पायामध्ये आत्यंतिक वेदना होत होत्या. त्यांना तपासणीकरीता रुग्णालयात नेण्यात आले. गुरुदेवांना वेदनाशामक औषधे देण्यात आली व २–३ दिवस चालू नये असा सल्ला देण्यात आला.



## नूतनीकरण झालेल्या कुटीराचे उद्घाटन

शुक्रवार, दि. २२ मार्च रोजी सकाळी ८ वा.२० मिनिटांनी गुरुदेव ध्यान–गृहात आले. अनेक अभ्यासी अजुनही ध्यानगृहात येत असल्याने त्यांनी शांतपणे १५ मिनिटे वाट पाहिली व त्यानंतर ५० मिनिटांचा सत्संग संचालित केला. एक साखरपुडा संपन्न केल्यानंतर त्यांनी तीन नवी पुस्तके प्रकाशित केली. त्यानंतर ते कुटीराकडे गेले. कुटीरामध्ये प्रवेश करतेवेळी ते म्हणाले, "या कुटीरापासून दूर जाऊन मला जवळ जवळ सहा महिने झाले!" यानंतर त्यांनी फीत कापली व दिवाणखान्यामध्ये दीप प्रज्वलन केले. आपल्या शयनकक्षामध्ये नैवेद्य दाखवून त्यांनी उपस्थितांना प्रसाद वाटला. एक भगिनी म्हणाली की 'तिसाव्या वाढदिवशीच मला वृद्ध झाल्यासारखे वाटत आहे' यावर गुरुदेव म्हणाले, " मी तुझ्या तिप्पट वयाचा आहे, पण मला अजूनही तरूण असल्यासारखे वाटते. वयापरत्वे विवेक येतो. मला वृद्ध असल्यासारखे वाटत नाही, पण माझे शरीर म्हातारे झाले आहे". अमेरिकेहून गुरुदेवांना भेटण्यासाठी भारतात आलेल्या एक अभ्यासीने गुरुदेवांना विचारले, "गुरुदेव, मी शारीरिक दुराव्याला कसे हाताळावे?" यावर गुरुदेव उत्तरले, "तुम्ही एकटे असताना गुरुदेव आपल्या सन्मुख बसलेले आहेत असा विचार करा." यावर तो अभ्यासी म्हणाला, "मी असाच विचार करतो आहे, पण कधीकधी शंका येते की हे खरे आहे की खोटे?" यावर गुरुदेव म्हणाले, "हीच पाश्चिमात्त्य अभ्यासींची समस्या आहे. बुद्धीमुळे शंका–कुशंका निर्माण होतात. जेव्हा शास्त्रज्ञ सांगतात की 'अणू'अस्तित्वात आहे तेव्हा तुम्ही त्यावर विश्वास ठेवता. त्याविषयी तुमच्या मनात किंतू का निर्माण होत नाही? तुम्ही कधी अणूला पाहिले आहे काय? विज्ञान आणि अध्यात्म यामध्ये अशी फूट पडलेली आहे की जे काही विज्ञान सांगते त्यावर आपण विश्वास ठेवतो व अध्यात्मामध्ये शंका–कुशंका उपस्थित करतो."

## अष्टांग योग व सहज मार्ग

बुधवार दि. २७ मार्च रोजी होळीचा दिवस होता. गुरुदेव बरेच थकलेले असूनसुद्धा अभ्यासींना प्रसन्नवदनाने भेटत होते. गुरुदेवांच्या नातवाचा, भार्गवचा वाढदिवस असल्यामुळे त्यांचे कुटुंबीय सकाळी आठच्या सुमारास त्यांना भेटण्याकरीता आले. यावेळी गुरुदेवांनी प्रसाद वाटला व आपल्या कार्यालयात सत्संगाचे संचालन केले. दुपारी 'उपनिषद गंगा' या टेलिविजन मालिकेचे दोन भाग त्यांनी बघितले. पारंपारिक योगाच्या आठ पायऱ्यांमधून सहज मार्गाची उत्क्रांती कशी झाली आहे यावर चर्चा सुरु होती.



यावेळी गुरुदेव म्हणाले:

*"यम आणि नियम हे घरी आई वडीलांकडून आणि शाळेत शिक्षकांकडून शिकावयाचे असतात. आसन आणि प्राणायाम– जेव्हा आपण ध्यान करतो श्वास नैसर्गिकपणे स्वत:चे नियमन करतो. जेव्हा तुम्ही खूप खोलवर ध्यानात असता, तेव्हा कधी कधी २–३ मिनीटांसाठी तुम्ही श्वासोच्छवास करित नाही. हे आपोआपच घडत असते. त्यानंतर अपरिग्रह, संचयीवृत्ती सर्व काही निघून जाते. ध्यान – ते आपण करतो. समाधी म्हणजे योगशास्त्रात म्हंटल्याप्रमाणे, ती एक पाषाणासारखी स्थिती नव्हे तर ती एक आंतरिक स्थिती आहे जी प्रारंभी होती. प्रारंभी म्हणजे अगदी प्रारंभी. तर अशी ही सहजमार्गाची शिकवण आहे. जेव्हा तुम्ही ध्यानामध्ये खोलवर जाता तेव्हा तुम्हाला त्याची अनुभूती होते. उदाहरणार्थ आज सकाळच्या ध्यानात मी क्षणभरातच लुप्त झालो. मी 'सुरु करा' असे म्हणालो आणि त्याच क्षणी मी लुप्त झालो. मी जे तुम्हाला सांगत होतो – आता मला समजले की महासमाधी कशी असते, कारण ध्यानामध्ये तुम्ही स्वत:ला मोकळे करता पुन्हा कधीही न परतण्यासाठी. त्या स्थितीतून बाहेर येणे अधिकाधिक कठिण होत जाते. कधी कधी मी सिटींग सुरु करतो, तासभर निघून जातो आणि ते मला एका क्षणासारखे वाटते. दोन तिन वेळा तर मी गोंधळून गेलो होतो की, बस करा म्हणावे की सुरु करा म्हणावे. म्हणून मी डोळे उघडून पाहिले की सर्वजण ध्यान करित आहेत तेव्हा मी 'बस करा' म्हणालो".*

नविन कुटीरामधील वास्तव्याच्या पहिल्या आठवड्यात गुरुदेव प्रयत्नपूर्वक भोजन कक्षामध्ये जाऊन तेथे जेवण्याचा प्रयत्न करत होते, पण नंतर त्यांनी आपल्या खोलीतच जेवण्यास सुरुवात केली. त्यांच्या पायांमध्ये वेदना होत होत्या विशेषकरुन चालत असताना वळल्यानंतर.या वेदना गुढग्यामध्ये तीव्र स्वरूपाच्या होत्या.

**अभ्यासींबरोबर मिश्र अनुभव**

एक दिवस पुणे येथील एक भगिनी आपल्या कन्येसोबत गुरुदेवांची भेट घेण्यासाठी आल्या. त्यांची कन्या पशु–शल्य चिकित्सक बनण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण घेत होती. गुरुदेवांनी तिच्या अभ्यासामध्ये स्वारस्य दाखविले व तिने केलेल्या शस्त्रक्रियांबद्दल तिला प्रश्न विचारले.

जबलपूर व गंज बसोदा या केंद्रांचे अभ्यासी गुरुदेवांना भेटू इच्छितात हा संदेश गुरुदेवांना मिळाला होता. जबलपूर हे माझे केंद्र आहे असे उद्गार काढून गुरुदेवांनी आपला आनंद व्यक्त केला व अभ्यासींना सायंकाळी ५ वाजता भेटण्यासाठी बोलाविले. अभ्यासी येण्याअगोदरच गुरुदेव तयार होते व त्यांची खुर्ची आणून ठेवण्यासाठी स्वयंसेवकांची मोठी धावपळ उडाली. गुरुदेवांनी सत्संग संचालित केल्यानंतर त्यांची भेट घेण्याकरीता मोठी घाई–गडबड झाली. या बेशिस्तपणामुळे गुरुदेव अस्वस्थ झाले होते. उपस्थितांना खाद्य–पदार्थ देण्यात आले. 'गुरुदेवांच्या कोणीही पाया पडू नये' अशी पुन्हा पुन्हा विनंति करुनसुद्धा अभ्यासी त्यांच्या पाया पडण्याचा प्रयत्न करीत होते. अशा घटनांमधून आपण धडा शिकणे आवश्यक आहे. गुरुदेवांच्या उपस्थितीत कसे वागावे हे समजण्याकरीता स्वत:मध्ये बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

**रविवार दि. ३१ मार्च २०१३**

आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने गुरुदेवांकरीता हा दिवस अत्यंत व्यग्र असा होता. लेखा–गटाबरोबरची गुरुदेवांची बैठक सुमारे तीन तास बंद दरवाज्याआड चालली होती. दुपारच्या भोजनानंतर ते 'गायत्री' येथे गेले. कुटीरामध्ये काही गोष्टींची दुरुस्ती बाकी असल्याने ते 'गायत्री' येथे काही दिवस राहिले. गुरुदेवांची नात माधुरी हिचे वास्तव्य चेन्नई येथे असल्याने तिच्याबरोबर काही काळ व्यतीत करण्याचे त्यांनी ठरविले. कितीही व्यग्र किंवा कठीण असा दिनक्रम असूनही संतुलित जीवन कसे जगावे हे गुरुदेव आपल्याला दाखवितात. आपल्या कुटुंबाकडे ते देत असलेले विशेष लक्ष हे आपण सर्वांनी अनुसरण्याजोगे उदाहरण आहे.

**एप्रिल २०१३**

'गायत्री' येथे गुरुदेवांचे वास्तव्य असताना राजकारणी व्यक्ती आपली सत्ता स्वार्थी हेतूंकरीता कसे वापरतात यावर एक चर्चा झाली. त्याबद्दलचे अधिकाधिक काही प्रसंग ऐकून गुरुदेवांना उबग आला. उच्च स्थानांवरील लोकांनी केलेला भ्रष्टाचार व सत्तेचा दुरुपयोग याबाबत ते अत्यंत नाराज होते. अशा गोष्टी अधिकाधिक बेलगामपणे होत आहेत असेही त्यांनी नमूद केले.

एक दिवशी चेरोकी येथील एक 'अमेरिकन इंडियन' (अमेरिकेतील मूळनिवासी) भगिनी 'गायत्री' येथे उपस्थित झाली. प्रारंभिक सिटींग्स घेतल्यानंतर गुरुदेवांना भेटण्यासाठी ती आली होती. गुरुदेव तिला म्हणाले, "तुम्ही प्रथम अमेरिकन इंडियन अभ्यासी आहात. माझ्या जवळ या, मी तुम्हाला पाहू इच्छितो." गुरुदेवांनी त्या भगिनीच्या डोळ्यांमध्ये खोलवर पाहिले. तिने स्वत:चे नाव 'गायत्री' असे सांगितले. गुरुदेव त्यांना म्हणाले, "माझा मुलगा कृष्णा पाच वर्षांचा असताना आम्ही हे घर बांधले. सहज

मार्गामध्ये येण्यापूर्वी आम्ही गायत्री मंत्र जपत असू, म्हणून या घराला ते नाव दिले आहे.”

गुरुदेवांनी तिला तिचे खरे अमेरिकन इंडियन नाव विचारले तेव्हा ती म्हणाली, “मी जेव्हा लहान होते, तेव्हा मला ‘छोटे हरीण’ म्हणत असत.” गुरुदेवांनी त्यांच्यासमवेत असलेल्या सर्व अभ्यासींचा तिच्याशी परिचय करून दिला व तिला आपलेसे केले.

गुरुदेवांना भेटलेल्या एका वृध्द जोडप्याने गुरुदेवांना सांगितले की त्यांचा अमेरिकेतील मुलगा भारतात येण्यास तयार नाही त्यामुळे ते त्याला भेटण्यास अमेरिकेस जात आहेत. गुरुदेव फार नाराज झाले व ते म्हणाले की त्यांना हे अजिबात मान्य नाही. ते म्हणाले, “ही माझी तुम्हाला सूचना आहे परंतु काय करायचे ते तुम्ही ठरवू शकता.” अशी थेट सूचना गुरुदेव क्वचितच करतात.

गुरुदेवांनी या आठवड्यात आपली नात माधुरी हिच्यासोबत भरपूर वेळ व्यतीत केला. ते तिला मॉलमधे घेऊन गेले व तिला भेटवस्तू घेऊन दिल्या. गुरुदेवांनी भेटवस्तूंची खरेदी कशी केली हे पाहणे फारच मनोरंजक होते. त्यांनी कुटुंबियांसाठी भेटवस्तू आणल्या, खरेदीच्या पावत्या सुरक्षित ठेवल्याची अतिशय दक्षतेने खात्री करून घेतली आणि आशीर्वादासह प्रेमपूर्वक त्या भेटवस्तू दिल्या. ते जे काही करतात, त्यामध्ये त्यांचे संपूर्ण लक्ष, हळुवारपणा व प्रेम असते.

दि. १२ एप्रिल शुक्रवार रोजी माधुरी लंडनला गेल्यानंतर गुरुदेवांचे मणपाक्कम येथील कुटीरामध्ये आगमन झाले. त्यांच्या उजव्या पायात तसेच उजव्या हातातही सतत वेदना होत होत्या. बुधवार दि. १७ एप्रिल रोजी गुरुदेव मणपाक्कम येथील एमआयओटी हॉस्पिटलमधे एम. आर. आय. स्कॅनसाठी गेले. यामध्ये काही काळासाठी उत्सर्जन चिकित्सेची (Radiation Treatment) गरज असल्याची परिस्थिती निदर्शनास आली. सर्वत्र एक खिन्नतेची भावना पसरली होती पण गुरुदेवांनी रविवार दि.२० एप्रिल रोजी सत्संगाचे संचालन करण्यासाठी ध्यानगृहात येऊन सर्वांना आश्चर्यचकित केले त्यानंतर बंधू चक्रपाणी यांचे तमिळ भाषण होईपर्यंत ते थांबले होते. त्यांचे आजारपण, त्यांची आध्यात्मिक वा प्रशासकीय नित्यकर्मे करण्यास त्यांना अटकाव करु शकत नाही. वेदना व गैरसोय असूनही गुरुदेव प्रत्येक गोष्टीस हसतमुखाने सामोरे जातात व नेहमीसारखेच प्रफुल्लित असतात. सी टी स्कॅनने समस्या असल्याची पुन्हा खात्री झाली आहे. हा अडथळा लवकरच दूर होऊ दे व आपल्या प्रिय गुरुदेवांना त्यांचे सामर्थ्य व आरोग्य परत प्राप्त होऊ दे अशी आपण सर्वजण एकत्र प्रार्थना करुया.

## मुदनुर येथील नवीन केंद्र, उ. कर्नाटक

उत्तर कर्नाटकातील भरपूर जलसंपदा व ऐतिहासिक महत्व असलेल्या मुदनुर येथे नवीन केंद्र सुरु करण्यात आले आहे. रविवारच्या सत्संगासाठी एका अभ्यासी बंधूंच्या घरी सुमारे पंधरा अभ्यासी नियमितपणे उपस्थित असतात. जवळपासचे प्रशिक्षक नियमितपणे भेट देऊन वैयक्तिक सिटींग देतात.

दि. ३१ मार्च रोजी मुदनुर गावातील शाळेच्या आवारात अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आसपासच्या भागातील जवळजवळ साठ अभ्यासी या कार्यक्रमास हजर होते. सकाळच्या व संध्याकाळच्या सत्संगाव्यतिरिक्त साधनेचे पायाभूत पैलूही तपशीलवार समजावण्यात आले. यानंतर एक प्रश्नोत्तराचे सत्र घेण्यात आले.

संध्याकाळच्या सत्संगानंतर आयोजित करण्यात आलेल्या खुल्या सत्रास जवळपास पंधरा मुमुक्षू हजर होते. डॉ. गजेंद्र सिंग, भगिनी मीरा कुलकर्णी व बंधू राजु कशामपुरकर यांनी या प्रसंगी भाषणे केली. एकूण प्रतिसाद फार चांगला होता. उपस्थित असलेल्यांपैकी काही जणांनी वैयक्तिक सिटींग घेण्याची इच्छा व्यक्त केली.

## ध्यानगृहाचे उद्घाटन, अहमदनगर

दि. ३१ मार्च २०१३ रोजी विभाग प्रमुख बंधू अरुणकुमार चौहान यांनी ध्यानगृहाचे उद्घाटन केले. आसपासच्या जिल्ह्यांतील अभ्यासी या उद्घाटन समारंभात सहभागी होण्यासाठी आल्यामुळे वातावरण आनंदी झाले होते. बंधू खानदेशी यांनी यासाठी देणगी दिली आहे. याची क्षमता सुमारे शंभर अभ्यासींची आहे.या ध्यानगृहामुळे हे केंद्र नियमित उपक्रम अधिक उत्तमरित्या आयोजित करु शकेल अशी आशा आहे.

कार्यक्रमाचा प्रारंभ सकाळच्या सत्संगानंतरच्या भजनाने झाला, त्यानंतर शीघ्र प्रगतीसाठी आपल्या साधनेमधील भक्तीची भूमिका स्पष्ट करून सांगणारे ‘भक्ती’ हे नाटक सादर करण्यात आले. त्यानंतर झालेल्या खुल्या सत्रामध्ये जीवन व सहजमार्ग यातील संतुलनाची गरज याची पुनरूक्ती करण्यात आली. नवीन ग्रंथालयाचे उद्घाटन भगिनी गीतांजली काळे यांनी केले. जेवणानंतर ‘दातृत्वाचे महत्व’ यावर एक नाटिका सादर करण्यात आली. संध्याकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सांगता झाली.





# अखिल भारतीय निबंध लेखन उपक्रम

प्रत्येक वर्षी अखिल भारतीय पातळीवर आयोजित केला जाणारा हा उपक्रम यू.एन.आय.सी. व एस.आर.सी.एम यांच्या सहकार्याने एकत्रितपणे राबविला जातो. या वर्षी ९,७९८ शैक्षणिक संस्थांमधील मधील १,७०,१४८ विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. राष्ट्रस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ दि. २४ फेब्रुवारी रोजी गुरगाव येथील विभागीय आश्रमात पार पडला. यू.एन.आय.सी.च्या भारत व भूतानसाठीच्या संचालक, श्रीमती किरण मेहरा–केर्पेलमन, या आदरणीय पाहुण्या होत्या. विवियन अॅन्ड्रयुज व सत्यार्थ शर्मा या भारतातील राष्ट्रस्तरीय विजेत्यांनी, या निबंध लेखनामुळे बहूमुल्य मर्मज्ञान मिळवणे सुलभ झाले असे विचार व्यक्त करून श्रोत्यांना प्रभावित केले.

विभागीय व संस्थांच्या स्तरांवरील बक्षिस वितरण समारंभ सर्व देशभरात मोठ्या उत्साहात आयोजित केले गेले होते. हा उपक्रम समाजाला सहजमार्गाची ओळख घडवणारा एक खुला मंच देखील झालेला आहे.

भुवनेश्वर,ओरिसा येथील विजेत्यांच्या पालकांनी या कार्यक्रमाचा अद्वितीयपणा व त्यांना केंद्राकडून मिळालेल्या आतिथ्याची प्रशंसा केली. चंद्रपूर, महाराष्ट्र येथे माजी अर्थ राज्यमंत्री श्री. शांतारामजी पोटदुखे, प्रमुख अतिथी होते व विभागप्रमुख बंधू राजेंद्र यांनी 'आध्यात्मिक साधनेची जीवनातील भूमिका' यावर भाष्य केले. रांची, झारखंड येथे नामांकीत अस्थिशल्यविशाद, डॉ. अनिल पांडे, हे प्रमुख पाहुणे होते. केंद्रप्रमुखांनी उपस्थितांना सहजमार्ग प्रणालीची ओळख करून दिली. थुमकुंटा, हैद्राबाद येथील विभागीय आश्रमात श्रीमती सुमन कपूर – आंतरराष्ट्रीय कार्यक्रम प्रमुख, बी.आय.टी.एस, पिलानी यांच्या हस्ते राष्ट्रस्तरीय व विभाग स्तरावरील विजेत्यांना प्रमाणपत्र व पदकांचे वितरण करण्यात आले. खम्माम आश्रम, आंध्रप्रदेश येथे श्री सी.एच. वेंकट रेड्डी, डी.ई.ओ हे प्रमुख अतिथी होते. तेथे 'मूल्यांवर आधारीत शिक्षणाची आवश्यकता' यावर भाषणे झाली. विजयवाडा आश्रम, आंध्रप्रदेश येथे केंद्रप्रमुखांनी 'प्रत्येकाच्या जीवनातील आध्यात्मिकतेची गरज' यावर जोर दिला. देवकोट्टाई तामिळनाडू, येथील शाळेमध्ये विभागीय विजेता एम. पवित्रा यांचा सन्मान करणारा छोटासा कार्यक्रम झाला. मेहसाणा, गुजरात येथे शालेय व महाविद्यालयीन विजेत्यांसाठी वेगवेगळे कार्यक्रम होते. यावेळी उपस्थितांना सहजमार्ग प्रणालीची ओळख करून देण्यात आली.

राजस्थान मधील विभागीय स्तरावरील कार्यक्रम अलवार आश्रम व राजगड येथे संपन्न झाला. अलवार आश्रमात सेंट्रल अॅकॅडमी, सिनीयर हायर सेकंडरी स्कूलच्या प्राचार्या, श्रीमती अंजना सहाय, या प्रमुख पाहुण्या म्हणून व डिस्ट्रीक्ट इंस्टीव्यूट फॉर एज्युकेशन अॅन्ड ट्रेनिंग (डी.आय.ई.टी) चे प्राचार्य, श्री. विष्णु स्वामी, हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. पय्यानूर, केरळ य–ेथील कार्यक्रमात श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. ए.के.सुधर्मा, यांनी अध्यक्षपद भूषविले. त्यांनी विजेत्यांना पारितोषिके दिली.













## साधनेत खोलवर रुजणे – प्रशिक्षण कार्यक्रम (जी.आय.टी.पी.)



अखिल भारतीय स्तरावर काही केंद्रांमध्ये या कार्यक्रमासाठी प्रशिक्षित केलेल्या समन्वयकांनी अतिशय उत्साहाने जी.आय.टी.पी. कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जी.आय.टी.पी. मध्ये चार घटक आहेत –दैनंदिनी लिहिणे, ध्यान, शुद्धिकरण आणि प्रार्थना. यापैकी प्रत्येकासाठी पूर्ण दिवसभराचा कार्यक्रम आयोजित केला जातो. छोटया–छोट्या गटांमध्ये चालणारी परस्पर–संवादी सत्रे, आत्मपरिक्षण, गुरुदेवांची वचने आणि 'व्हिस्पर्स' मधील संदेश यांचा उपयोग करुन साधनेची गुणवत्ता वाढवणे हा या कार्यक्रमाचा केंद्रबिंदु आहे.



उ.प्रदेशात बी.एम.ए.,लखनौ, कानपूर आणि मैनपूरी येथे प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली होती. अलाहाबाद येथील समन्वयकांच्या एका चमूने फतेहपूर आणि प्रकाशगढ केंद्रांमध्ये तीन दिवसांचा एक कार्यक्रम आयोजित केला होता. ओडिसामध्ये, बडौदा केंद्रातील समन्वयकांच्या गटाने, ओडिसामध्ये भुवनेश्वर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमास वीस अभ्यासी उपस्थित होते.



गोदावरी खाणी, श्रीरामपूर, वारंगल, भोंगिर, बेल्लामपल्ली, आणि हैद्राबाद येथील अभ्यासींसाठी हैद्राबाद येथील विभागीय आश्रमात तीन दिवसांचे एक याप्रमाणे दोन सत्रे तेलुगूमध्ये आयोजित करण्यात आली होती. दोमलगुडा आश्रम, हैद्राबाद येथे प्रत्येक रविवारी तेलुगूमध्ये पूर्ण दिवसाचा कार्यक्रम संपन्न झाला. विजयवाडा (आ.प्र.) येथे जवळपासच्या केंद्रांमधील सुमारे १०० अभ्यासींसाठी प्रत्येकी चार दिवसांचे एक याप्रमाणे चार सत्रे आयोजित करण्यात आली होती.

कोलकत्ता येथील समन्वयकांच्या गटाने सिलिगुडी आणि बंदेल येथे एक दोन दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला. अशाच प्रकारचे कार्यक्रम राणीगंज आणि गंगटोक येथे एप्रिल ते जूनच्या दरम्यान आयोजित करण्यात येतील.



गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या राज्यांतील आठ प्रभागांमधील अभ्यासींसाठी गुजरात, अहमदाबाद येथील अडालज योगाश्रम, येथे जी.आय.टी.पी.ची सत्रे आयोजित करण्यात आली होती. गुजरातमधील बडोदा आणि वलसाड आश्रमात प्रत्येकी दोन दिवसांची अनेक सत्रे आयोजित करण्यात आली होती.



तामिळनाडूच्या विविध ठिकांणांहून आलेल्या अकरा समन्वयकांनी जवळजवळ सत्तर अभ्यासींसाठी उदुमलैपेठ आश्रमात सलग दोन रविवारी दैनंदिनी लिहिण्याविषयी एक जी.आय.टी.पी प्रशिक्षण कार्यक्रम संचालित केला. मध्य प्रदेशात जानेवरी ते मार्चपर्यंत उज्जैन, विदिशा आणि इंदौर केंद्रामध्ये दहा जी.आय.टी.पी. सत्रे आयोजित करण्यात आली. दिलेल्या सूचनांनुसार आयोजित करण्यात आलेले हे प्रशिक्षण कार्यक्रम अभ्यासींनी चांगल्या रितीने स्वीकारले ज्यामुळे भविष्यात अशा प्रकारचे आणखी कार्यक्रम करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.



## पाली, राजस्थान येथे कार्यशाळा.

दि. २३ व २४ मार्च २०१३ रोजी दोन दिवसांची एक कार्यशाळा पाली जिल्ह्यामध्ये आयोजित केली होती. यामध्ये सात विविध शहरांमधून आलेल्या ११५ अभ्यासींनी भाग घेतला. साधना व त्यासंबंधीच्या प्रश्नांवर ही कार्यशाळा आधारित होती. सकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांचे ध्वनीचित्रमुद्रण दाखविण्यात आले. 'ध्येय' या मुद्यावर आधारित सादरीकरणे व खेळ आयोजित केले गेले. सामूहिक उपक्रमांद्वारे अभ्यासींनी साधनेदरम्यान येणाऱ्या अडचणी प्रस्तुत केल्या. सत्राची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली.

दुसऱ्या दिवशी कार्यशाळेची सुरुवात गुरुदेवांच्या ध्वन–ीचित्रमुद्रणापाठोपाठ त्यांची भाषणे व दहा नियमांवरील चर्चासत्राने झाली. भजने व एक बासरी वादनाचा कार्यक्रमही या कार्यशाळेचा भाग होता. दैनंदिन जीवनामध्ये गुरुदेवांवर विसंबून राहण्याच्या विषयावरील बऱ्याच प्रश्नांची उत्तरे प्रशिक्षकांनी दिली. सायंकाळच्या सत्संगाने दिवसाची सांगता झाली.

## पम्मारु, आंध्रप्रदेश येथे पूर्ण दिवसाचा कार्यक्रम.

पम्मारु हे विजयवाडा येथून ३० किमी अंतरावर कृष्णा जिल्ह्याच्या पूर्व भागामध्ये वसलेले एक खेडेगाव आहे. २००९ मध्ये केवळ २ जणांपासून सुरुवात झालेल्या या केंद्राची झपाट्याने वाढ होत आज तेथे १२० अभ्यासी आहेत.

विजयवाडा केंद्राच्या मदतीने या केंद्राच्या अभ्यासींनी ३१ मार्च रोजी एक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सुमारे १८० जणांनी यामध्ये भाग घेतला. विजयवाडाचे केंद्रप्रभारी बंधू के. व्ही. सुब्बाराव यांनी आपल्या स्वागतपर भाषणामध्ये दर शुक्रवारी दिले जाणारे गुरुदेवांचे सिटींग यासमवेत निरंतर साधनेची गरज यावर भर दिला. ज्या केंद्रामध्ये प्रशिक्षक उपलब्ध नसतील अशा ठिकाणी या सिटींगचा कसा उपयोग होतो यावर ते सविस्तर बोलले. आगामी एप्रिलमधील भंडाऱ्यासंबंधीच्या बऱ्याच मुद्द्यांची चर्चाही यावेळी झाली.



## रायपूर, छत्तीसगढ, येथे भगिनींचा कार्यक्रम

रायपूर आश्रमामध्ये दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी भगिनींच्याद्वारे एक कार्यक्रम आयोजित केला जातो. 'मानव विकासातील गुरुदेवांची भूमिका' या पुस्तकामधील 'आज्ञापालन' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन दि. ३१ मार्च रोजी करण्यात आले होते. या विषयाच्या अर्थावर व आज्ञापालन आपल्या जीवनामध्ये कसे बाणविले जावे यासारख्या प्रश्नांवर आत्मपरिक्षण करण्यासाठी कार्यक्रमाची आखणी केली होती. या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी अभ्यासींना विविध गटांमध्ये विभागले गेले. आध्यात्मिक प्रगतीसाठी आज्ञापालन हे नित्–ांत गरजेचे असून आज्ञापालन अंगी बाणविण्यासाठी सहजमार्गाच्या १० नियमांचे पालन हे एकमेव साधन आहे या एकमताने या चर्चासत्राची सांगता झाली. या कार्यक्रमाने अभ्यासींमध्ये साधन–ेसाठीचा उत्साह वृद्धिंगत झाला.

## भिलवाडा, राजस्थान येथे पूर्ण दिवसाचा कार्यक्रम.

१३२ अभ्यासींच्या उपस्थितीत दि. ३ मार्च रोजी भिलवाडा येथे एका कार्यक्रमाची सुरुवात झाली. शहाजहानपूर येथे झालेल्या हिंदीमधील प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या एका भगिनीने आपले अनुभव संगितले.

कार्यक्रमाचा मूळ विषय 'भंडारा' हा होता. 'जीवन हे एक पर्यायांची शृंखला असून योग्य पर्याय निवडणे किती महत्वाचे आहे' हे दर्शविणारी एक नाटिका युवकांनी प्रस्तुत केली. एका परस्पर संवादी सत्रामध्ये अभ्यासींनी त्यांची भंडाऱ्याबद्दलची उमज प्रस्तुत केली. भंडाऱ्यामधील दिवस हे कृपाप्रसादाने भारलेले असून त्यामध्ये सहभागी होणाऱ्यांना प्रेम व बंधुभाव यांच्या वृद्धीकरीता सुसंधी मिळते असे निरिक्षण नोंदविण्यात आले. भंडाऱ्यासंबंधी व्हिस्पर्समध्ये जे संदेश आहेत ते वाचून दाखविले गेले व त्यानंतर एक ध्वन–ीचित्रमुद्रण दाखविण्यात आले. कार्यक्रमाची सांगता सत्संगाने झाली.






## युवा कार्यक्रम, नाशिक, महाराष्ट्र

दि. २४ मार्च रोजी नाशिक येथील तोफखाना केंद्रातील भूसेना अधिकारी लेफ्ट. कर्नल सुधीर पराशर यांनी सुमारे २५ सहभागींसाठी 'नेतृत्व' या विषयावर एक कार्यक्रम संचालित केला. नेता कसा असावा व त्याच्याकडे खरे नेतृत्वगुण काय असावेत याविषयी प्रत्येक सहभागीने आपल्या कल्पना व्यक्त केल्या. जो स्वतःचे उदाहरण घालून देऊन नेतृत्व करतो त्याचेच नेतृत्व सच्चे व परिणामकारक ठरते, असे मत सर्वसाधारणपणे व्यक्त करण्यात आले. त्यानंतर सैन्यातील नेतृत्वापासून काय बोध घ्यावा यावर एक सादरीकरण प्रस्तुत करण्यात आले.

शांति, ऐक्य व जागतिक समुदायात शांततापूर्ण सह–अस्तित्वासाठी सहजमार्गामधील युवकांनी दीपस्तंभाप्रमाणे बनावे, असे गुरुदेवांना वाटते, यावर प्रकाशझोत टाकण्यात आला. प्रोत्साहनपर चित्रफिती व दैनंदिन जीवनातील खरीखुरी उदाहरणे हृदयावर कायमचे छाप उमटवून गेली. खरा नेता केवळ मार्गच दाखवत नाही व स्वतःही त्या मार्गावरून चालतो इतकेच नाही तर तो स्वतःच मार्ग बनतो, ह्या गुरुदेवांच्या शब्दांची युवकांना आठवण झाली. त्यांनी आपल्या प्रिय गुरुदेवांच्या अपेक्षेप्रमाणे जगण्याचा निश्चय केला.

## युवा कार्यक्रम, पश्चिम बंगाल

दि. १५ मार्च रोजी, कोलकाता केंद्राने १५ अभ्यासींसाठी एक युवा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या उद्दिष्टांविषयी अभ्यासींना अवगत केल्यानंतर प्रत्येक अभ्यासीने आपला परिचय करून दिला. 'जीवनातील गरजा व इच्छा' या गुरुदेवांच्या भाषणाच्या छापील प्रति सहभागींना देण्यात आल्या. त्या भाषणातून त्यांना काय समजले याविषयी बोलण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.
गरजा व इच्छा यामधील भेद स्पष्ट करणे, त्याचप्रमाणे गरजांचे शारीरिक, भावनिक व मानसिक इत्यादि प्रकार, प्रत्येकजण गरजांकडून इच्छांकडे कसा वाहवत जातो, तसेच सहजमार्ग ईश्वराशी अनुसंधान साधण्याच्या गरजेची पूर्तता कशी करू शकतो, हे ह्या चर्चासत्राचे प्रमुख पैलू होते.

## गृह संमेलन, गुवाहाटी, आसाम

गुवाहाटी केंद्रातील सदतीस अभ्यासी एका अभ्यासीच्या घरी बैठकीसाठी जमले होते. सत्संगानंतर गुवाहाटी आश्रमातील स्वयंसेवेने करावयाच्या कामांसंबधी चर्चा करण्यात आली. तसेच २०१२ च्या निबंध लेखन कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. येत्या वर्षातील निबंध स्पर्धेमध्ये भाग घेण्याकरिता शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहित करण्यासाठी कोणती पावले उचलावित या विषयी चर्चा करण्यात आली. आश्रमाची परिणामकारकता वाढविण्यासाठी नियमितपणे खुल्या सत्रांचे आयोजन करण्याचे तसेच नविन अभ्यासींना पडणाऱ्या प्रश्नांवर स्पष्टीकरण देण्याऱ्या सत्रांचे आयोजन प्रत्येक महिन्यात करण्याचे ठरविण्यात आले.

आपल्या स्वतःच्या उत्क्रांतीमध्ये गुरुदेव करत असलेल्या कार्यात सहभागी होण्याच्या आवश्यकतेवर बैठकीत चर्चा करण्यात आली. गुरुदेवांच्या कार्यात सहभागी झाल्यामुळे आपण सहनशीलता, बंधुभाव व आज्ञापालन शिकतो आणि सतत स्मरणामध्ये आपल्याकडून ते नकळतपणे घडते. आपल्या



आध्यात्मिक यात्रेमध्ये ते महत्वाचे असते. ह्या बैठकीमुळे सर्व अभ्यासींमध्ये बंधुभावाची तीव्र भावना वाढीस लागली.

## युवा संमेलन, भिलवाडा, राजस्थान



दि. २४ मार्च रोजी ध्येय या विषयावर झालेल्या बैठकीस सोळा अभ्यासी उपस्थित होते. मानवी जीवनाचे ध्येय, आध्यात्मिक साधनेत गुरुंचे महत्त्व, ध्यान करण्याची गरज, शुद्धीकरण प्रक्रिया, रात्रीची झोपण्यापूर्वीची प्रार्थना व सतत स्मरण या विषयांवरील चर्चेला प्रश्नोत्तरांचे सत्र सहाय्यकारक ठरले. 'सहजमार्गाची मूलतत्वे' या ग्रंथातील उतारे वाचून दाखविण्यात आले. सहजमार्गातील या पैलूंबद्दलचे अभ्यासींचे आकलन व प्रत्यक्षात हे पैलू नेमके काय आहेत यातील तफावत दूर करणे, हे या चर्चासत्राचे उद्दिष्ट होते.

मार्चच्या शेवटच्या रविवारी ध्यानानंतर युवकांची बैठक घेण्यात आली. मिशनच्या उपक्रमांमध्ये युवकांचा सहभाग कसा वाढवावा या विषयी चर्चा करण्यासाठी तेरा अभ्यासी बैठकीस उपस्थित होते. प्रत्येक रविवारी ध्यानानंतर थांबण्याचे अभ्यासींनी ठरविले. जे थोडे अभ्यासी नियमित नाहीत त्यांना भेटण्याचे ठरविण्यात आले. या भेटींचे आयोजन, ज्या अभ्यासींनी अशा अनियमित अभ्यासींना सहजमार्गाची ओळख करून दिली होती त्या अभ्यासींच्या सहाय्याने करण्याचे ठरले. यामुळे अभ्यासींना त्यांच्या साधनेत येणाऱ्या समस्या मांडता येतील व त्यांचे निराकरण करून घेऊन आपली साधना जोमाने पुढे चालू ठेवता येईल अशी अपेक्षा आहे.

## नविन प्रकाशने



हृदयीचे बोल २०१०
तेलुगु
तमिळ
मराठी
मल्याळम
कन्नड
गुजराथी
हिंदी.

## नविन नियुक्ती


**भगिनी जननी सुब्रमणियन**

मिशनच्या मुख्यालयामध्ये मानव संसाधन विभागामध्ये व्यवस्थापक.

**बंधू इंदूशेखरन व्ही. पिल्लई**

केंद्रप्रमुख – तिरुवनंतपूरम केंद्र

---



व्हिस्पर्स फ्रॉम द ब्राईटर वर्ल्ड ५ वे अविष्करण



माझे गुरुदेव तामिळ, हिंदी



मानव विकासात सदगुरुंची भूमिका – मराठी, कन्नड, मल्याळम.




हृदयीचे बोल २०१२ – इंग्रजी




हृदयीचे बोल २००८ – कन्नड


---




डाऊन मेमरी लेन खंड १ – तेलुगु





कंप्लीट वर्क्स ऑफ रामचंद्र (लालाजी महाराज) खंड २ – इंग्रजी




कोळ्याचे जाळे – खंड २ – इंग्रजी





प्रोसिडींग ऑफ द फ़र्स्ट क्रेस्ट सेमिनार – इंग्रजी





मानव विकासात सदगुरुंची भूमिका – एमपी३ – इंग्रजी

---





कॉल ऑफ द डिव्हाईन – डिव्हीडी – इंग्रजी





लाईफ ऑफ बाबूजी – डिव्हीडी – हिन्दी





जर्नी इन टू द हार्ट – डिव्हीडी – इंग्रजी




हृदयीचे बोल २०११ – डिव्हीडी – इंग्रजी





द हार्ट ऑफ लव्ह – डिव्हीडी – इंग्रजी





सतखोल – हेवन ऑन अर्थ – डिव्हीडी – इंग्रजी


---




मोमेन्ट्स विथ द बिलव्हड – डिव्हीडी – इंग्रजी




मेसेज ऑफ द हार्ट – डिव्हीडी – इंग्रजी




प्रेम आणि मृत्यू – एमपी३ – इंग्रजी




माझे गुरुदेव – एमपी३ – इंग्रजी हिन्दी तामिळ




हृदयीचे बोल २००७ – एमपी३ – इंग्रजी

# अमलापुरम आश्रम, आंध्र प्रदेश

## प्रकाशाचे केंद्र



अमलापुरम हे एक मध्यम आकारमानाचे शहर आंध्र प्रदेशच्या पूर्व गोदावरी जिल्ह्यात राजमुंद्री शहरापासून ६० किमी अंतरावर आहे. काकिनाडा आणि राजमुंद्री ही अमलापूरमला जोडणारी दोन प्रमुख शहरे आहेत. हा आश्रम भारतातील सर्वात जुन्या आश्रमांपैकी एक असून आंध्र प्रदेशात बांधला गेलेला तिसरा आश्रम आहे. जवळजवळ चार दशकांपासून हे अध्यात्माचे केंद्र आहे.

१९६९ मध्ये मिशनमध्ये आलेले आणि आपले मित्र डॉ. अप्पारी रामकृष्ण यांनाही मिशनमध्ये घेऊन आलेले श्री.पी.बी.नायडू यांनी हे केंद्र १९७१ मध्ये स्थापन केले. तेच नंतर या केंद्रातील प्रथम प्रशिक्षक झाले आणि साप्ताहिक सत्संग त्यांच्याच निवासस्थानी होऊ लागला. या सत्संगासाठी सुमारे पंधरा ते वीस अभ्यासी उपस्थित राहू लागले. त्यांनी अमलापुरम महापालिकेत आश्रमाच्या इमारतीसाठी ४८४ चौ.यार्ड जागेचा प्रस्ताव ठेवला. बाबूजी महाराजांची परवानगी मिळाल्यानंतर अभ्यासींनी उदारपणे दिलेल्या देणग्यांच्या मदतीने ती जागा खरेदी केली गेली. हे ठिकाण सरकारी बस स्थानकापासून १ किमी च्या अंतरावर आहे.

नंतर केंद्रप्रमुख श्री.वि.पी.डी. नागेश्वर यांनी दि.१० मार्च १९८२ रोजी इमारत बांधकामाची कोनशीला ठेवली. बांधकाम अठरा महिन्यांत पूर्ण करण्यात आले. बाबूजी महारांजांकडून आश्रमाचे उद्घाटन झाल्याचे आणि तो वापरण्यासाठी तयार झाल्याची बातमी ऐकल्यानंतर अभ्यासींनी ध्यानासाठी ती जागा वापरण्यास सुरुवात केली. त्यानंतर भगिनी कस्तूरी या केन्द्रास भेट द्यावयास आल्या असता त्यांच्या हस्ते आश्रमाचे औपचारिकरित्या उद्घाटन झाले.

ध्यानगृहाचा आकार २२ X ३२ फूट असून त्यामध्ये ९ फूटांचा व्हरांडा आहे. त्यास चारही कोपऱ्यात चार दरवाजे आहेत आणि पहिल्या मजल्यावर दोन खोल्या आहेत. सध्या या खोल्यांचा उपयोग बालकेंद्र, वाचनालय आणि आश्रमाचे कार्यालय म्हणून होतो. गुरुदेवांच्या परवानगीने आणि विभागप्रमुख बंधू मधू कोथ्थापल्ली यांच्या सहकार्याने २०१०–११ दरम्यान स्वयंपाकघर आणि प्रसाधनगृह यांची भर घालून आश्रमाच्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. जवळजवळ ऐंशी अभ्यासी येथे रविवारच्या सत्संगास हजर असतात. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी आश्रमात पूर्ण दिवसीय कार्यक्रम असतो. या केन्द्रांत दोन प्रशिक्षक आहेत.

हा आश्रम राझोल, जग्गन्नापेटा, नरसापूर आणि यनम या उपकेंद्रापासून जवळ आहे. गुरुदेवांनी दि.१६ एप्रिल १९८६ रोजी त्यांच्या पत्नी भगिनी सुलोचना य–ांच्यासमवेत आश्रमास भेट दिली होती आणि येथे त्यांनी दोन दिवस मुक़्काम केला होता.






To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2013 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.